# सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अर्थसंकल्प

## मा. आयुक्त यांचे निवेदन

मा. स्थायी समितीचे सभापती श्री. अशोक सुर्यदेव तिवारी उपस्थित सन्माननीय स्थायी समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग महाराष्ट्र महानगरपालिका कलम ९५ अन्वये महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पिय अंदाज आपणासमोर सादर करीत आहे.

मिरा-भाईंदर शहराची दिवसेंदिवस झपाटयाने वाढणारी लोकसंख्या विचारात घेता शहराला पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सेवा, तसेच राबविण्यांत येणाऱ्या नवनविन योजना वाढत्या लोकसंखेचा विचार करता अपुऱ्या पडत आहेत. महापालिकेचे मर्यादित उत्पन्न पाहता नविन योजना राबविण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन योजना मुदतीत पुर्ण कराव्या लागत आहेत. परिणामी कर्ज परतफेड करणे व मुलभूत सेवा पुरविणे भविष्यकाळात अडचणीचे होऊ नये. यासाठी महापालिकेला आपले स्वतःचे उत्पन्न वाढविणे शिवाय गत्यंतर नाही.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पुरविण्यांत आलेल्या मुलभूत सेवासुविधांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ९५ (अ) नुसार तुटीचा अहवाल सोबत जोडण्यांत आलेला आहे. कृपया या अहवालाचे अवलोकन व्हावे. याद्वारे मुलभूत सेवासुविधा पुरविताना दरवर्षी येणारी तूट पाहता महापालिकेचे उत्पन्न वाढविणेसाठी कर/दर वाढ करणे क्रमप्राप्त असल्याचे आपणांस दिसून येईल. असे असताना देखील या अर्थसंकल्पात कुठल्याही प्रकारची कर/दर वाढ करण्यात आलेली नाही. मागील ३ वर्षातील सरासरी प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चावर आधारीत अर्थसंकल्प तयार करण्यांत आलेला आहे. नविन योजना/प्रकल्प यासाठी महापालिकेच्या स्वनिधी बरोबर शासन अनुदान रक्कम या अर्थसंकल्पात दर्शविण्यांत आलेल्या आहेत. तसेच मर्यादित उत्पन्नानुसार खर्चात काटकसर करण्यांत आलेली आहे.

## उत्पन्नाच्या ठळक बाबी

(आकडे कोटीत)

| | | |
|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर | 85.00 |
| 2 | GST अनुदान | 221.00 |
| 3 | स्थानिक संस्था कर व 1% मुद्रांक शुल्क अधिभार | 62.00 |
| 4 | पाणी पुरवठा जलनिःसारण व मलनिःसारण | 107.70 |
| 5 | इमारत विकास आकार/मुलभूत सुविधा शुल्क | 70.00 |
| 6 | रस्ता नुकसान भरपाई | 50.00 |
| 7 | मोकळया जागेवरील कर | 22.00 |
| 8 | आरोग्य घनकचरा व्यवस्थापन शुल्क | 13.75 |
| 9 | बाजार फी | 8.00 |
| 10 | जाहिरात/होर्डींग्ज/पे ॲण्ड पार्क | 10.75 |
| 11 | अनधिकृत बांधकाम शास्ती | 3.00 |
| 12 | परवाना फी | 2.00 |
| 13 | शासन अनुदाने | 580.71 |
| 14 | वित्तसंस्थाकडून कर्ज | 270.00 |
| 15 | संकिर्ण उत्पन्न | 59.93 |
| 16 | असाधारण उत्पन्न | 62.00 |
| 17 | आरंभिची शिल्लक | 6.72 |
| | | |
| | | |
| | | |
| | **एकुण** | **1634.56** |

## खर्चाच्या ठळक बाबी

(आकडे कोटीत)

| | | |
|---|---|---|
| 1 | स्थायी/अस्थायी वेतनातील खर्च | 142.47 |
| 2 | कर्ज परतफेड निधी | 41.33 |
| 3 | आरोग्य- वॉर्ड सफाई, नालेसफाई, घनकचरा व्यवस्थापन | 151.65 |
| 4 | पाणीपुरवठा जलनिःसारण व मलनिःसारण | 137.11 |
| 5 | सार्वजनिक बांधकाम | 131.60 |
| 6 | नगरसेवक निधी/प्रभाग निधी | 25.72 |
| 7 | विजदेयक/विज दुरुस्ती | 37.00 |
| 8 | विकास आराखडा/नगररचना विभाग | 12.50 |
| 9 | उद्यान विकास | 18.05 |
| 10 | शिक्षण विभाग | 25.13 |
| 11 | रुग्णालये/दवाखाना | 11.45 |
| 12 | वृक्षप्राधिकरण | 8.75 |
| 13 | आपत्ती व्यवस्थापन | 8.50 |
| 14 | “P” अंदाजपत्रक | 27.00 |
| 15 | MMRDA कडून रस्ते/कल्व्हर्ट बांधकाम | 90.00 |
| 16 | मुलभूत सुविधा | 25.00 |
| 17 | अंदाजपत्रक ‘ब’,‘क’, वृक्षप्राधिकरण, महिला व बालकल्याण, “P” अंदाजपत्रक व शिक्षण विभाग कडे रक्कम वर्ग | 111.48 |
| 18 | योजना/ विकास कामे | 378.10 |
| 19 | बांधकामे नविन / दुरुस्ती | 251.50 |
| 20 | **अखेरची शिल्लक** | 0.22 |
| | **एकुण** | **1634.56** |

## या अंदाजपत्रकातील महत्वाच्या योजनांवरील खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

(आकडे कोटीत)

| अ.क्र | | |
|---|---|---|
| 1 | मुख्यमंत्री सडक योजना/नगरोत्थान अभियान (सिमेंट कॉंक्रीट रस्ते बांधकाम) | 102.00 |
| 2 | पर्जन्य जलवाहिन्या अमृत अभियान | 54.00 |
| 3 | UTWT सिमेंट रस्ते बांधकाम | 75.00 |
| 4 | किल्ला जीर्णोध्दार (शिवसृष्टी प्रकल्प राबविणे) व सुशोभिकरण करणे | 5.00 |
| 5 | जैव विविधता उद्यान | 1.10 |
| 6 | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे व सुशोभिरण | 1.00 |
| 7 | मा. बाळासाहेब ठाकरे व मा. प्रमोद महाजन आर्ट गॅलरी/कलादालन उभारणे | 6.00 |
| 8 | नविन रस्ते बांधकाम/गटारे बांधकाम | 16.00 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधकाम | 12.00 |
| 10 | सफाई कर्मचारी निवास स्थान बांधणे | 1.00 |
| 11 | 218 द.ल.लि. सुर्या प्रकल्प पाणीपुरवठा योजना | 205.00 |

महानगरपालिकेचे अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता सन 2019-2020 चे सुधारित अंदाजपत्रक रु. **1192** कोटी **77** लाख **15** हजार जमा व रु. **1186** कोटी **5** लाख **15** हजार खर्च तसेच सन 2020-2021 चे मुळ अंदाजपत्रकात अपेक्षित जमा रु. **1634** कोटी **55** लाख **97** हजार तसेच खर्च रु.**1634** कोटी **33** लाख **97** हजार व रु **22** लाख शिलकेचे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर शहराच्या मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधीपक्ष नेते, व सर्व सन्माननीय सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग शहरातील विचारवंत, वृत्तपत्र प्रतिनीधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांचे मी आभार मानतो. या अर्थसंकल्पातील उद्दीष्ट पुर्तीसाठी यापुढेही आपल्या सर्वांचे सहकार्याची अपेक्षा करतो.

धन्यवाद !

**दिनांक :-**
**ठिकाण :- भाईंदर (प.)**

**श्री. चंद्रकांत कृ. डांगे** (भा.प्र.से)
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**